दुहरा वहरी

दुहरो अंक

२३ जून २०१३

# कादोडी

## संजावश्या हनाव विशेषांक

खाजगी वितरन

अंकाई किंमत (स्वखुशीने) :- दा रुपय

संपादक :- ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८) **Email :-** kadodivasai@gmail.com

संपादक मंडळ :- सायमन रॉड्रिग्ज, सुनील डिमेलो, एडवर्ड डिसोझा, डॅनियल मस्करणीस, राजन डिमेलो, जेम्सन डिमेलो, रॉबर्ट फर्नांडिस, रॉबिन्सन डिमेलो, वॉल्टर तुस्कानो

**Web: -** www.onevasai.com मुद्रकः- मॅन्युएल प्रिंट, वसई पूर्व – ९७६५८७४४९३

## संपादकीय

मंडळी, सगळ्यांना संजावश्या हनायो शुभेच्छा. "कादोडी" इ त्रैमासिक आपल्या कुपारी समाजाआ तुमश्या सगळ्यान्श्या प्रेमोर टीकॉन हाय, त्यामुळें तुमश्या दरनें यापुढेंपन अहीस अपेक्षा करत्याव. "कादोडी" वहाराला ४ वॅळा प्रकाशित हॉवातें, ईस्टर, संजावसॉ हन, मावलीओ हन आन नाताळसॉ हन आहा या प्रकाशन अहनार. आमाला कायिक ठिकानी खुब चांगलॉ प्रतिसाद मिळालें, तडे, त्या पॅरिशमिनें अंक कमी पडात्यात, दुहऱ्या बाजूला कायिक ठिकानी अंक तहॅस पडॉन रॅत्यात आन भगूनुस वहाराला एकदास वार्षिक वर्गनी भरॉन यो अंक आपल्यापोत पॉसव्यासॉ आमसॉ विसार हाय, मॅं आपल्या तरुन, यंग मंडळीला आवाहन करतें की त्यायी या अंका वितरन कऱ्याश्या कामात आमश्या बरोबर या. आपल्या समजाश्या १३ पॅरिशमिने प्रत्येक गावात यो अंक पॉसलॉ पाय अहॉ आमसॉ पयल्यापासून विसार हाय, पन वितरन व्यवस्थेआ अभावी आमाला ता शक्य हॉवें नाय. तहास यॉ अंक वासनाऱ्या सगळ्या वाचकांना अही विनंती हाय की तुमॅं फूल ना फुलायी पाकळी समजॉन जा का दान देद्या त्याआ आमॅं मनापासून स्वागत करन्याव, त्यामुळे आमाला पुढसॉ अंक काड्या पैशायी कमी पड्याशी नाय.

मंडळी, या वहरा पान्यानें मस्त सुरवात केले पन गेल्या वहरा तुमॅं बगीला हायदे तें पानी कमी पडल्यामुळे आपल्या राज्यात आन देशात का हालत झाली ती? आपल्या वसईमिने पान कायिक ठिकाना पानीटंचाई होती. आपुन नवा घर बांधीत्याव, त्या बाजूला कंपाऊंड घालत्याव, आतमिन्श्या जागेत कॉबा करत्याव, मिंगारा बाव बांधिलें त्यावरपन छप्पर टाकिलें मग आमॅं हांगात्याव आमश्या बायीसॉ पानी प्याश्या लायकीसॉ नाय, त्यात जाम क्षार हात, पाहाळ्याव पानी आपुन थांबवितुस नाय ते आपल्या बायीसॉ पानी कहॉ प्याश्या लायकीओ रॅदें. ताहा बगीला तें आपुन पानी थांबवित्यात पन कडे माइतीआ? आपल्या समोरश्या गटारात. प्लास्टीकवर सरकारनें बंदी हाडलें, आपल्या आडे कायिक संघटनायी कापडी पिवश्यो बनवॉन वाटील्यो पान आमॅं कय प्लास्टीक पिवश्यो वापऱ्यासा हॉड्या नाय, कादो ते कापडी पिवशी बाजारात तन घॅवॉन जादो लाज वाटातें, अरे पन लाने असताना कापडी पिवशीस आपला दप्तार हॉता गा नाय.. या प्लास्टीकश्या पिवश्यामुळे आजूबाजूसॉ सांडपानी अडकालें मग पावसाळ्यात आपल्या घरा आजूबाजूला तळे हॉवात्यात, थोडीफार कुन शेती करतें त्या जमीनिऑ कस कमी झाले. पण जॉपर्यंत मा आंगाशी ये नाय तॉपर्यंत माला कईस कऱ्या वाटे नाय, मॅं, मायी फॅमिली आतमिनें सुशेगात हात, लोका मातें का करॅं अहॉ आपलॉ आजकाल विसार सललें आन आपलॉ समाज एकत्र रॅतॉतॉ, एकत्र खातॉ-पॅतॉतॉ यी गोष्ट आमॅं आतें बाहाल्यात.. आन मांजरा गळ्यात घंटा कुनॅं बान्ध्याशी, मॅं कादो, तो बांधीदें.. अहॉस आमॅं प्रत्येक जन आते विसार करत्याव, मग आपलें यॅं सगळॅं प्रश्न कुनॅं हॉड्व्याशॅं, दर वहरा पर्यावरणदिना दिहा आमॅं झाडे लावीत्याव पन तिहऱ्या वहारा परत तॉस खडडॉ झाडे लाव्या रेडी आहातें. मंडळी यावर आपुन नक्कीस विसार करद्या अही आशा हाय.

आयतवार १६ जुनश्या लोकमत पेपरमिने आपली भाषा नष्ट होव्याश्या मार्गोर हाय आहा लीविले पण माला वाटाते आपुन ती नक्कीस टिकवोन ठोविन्याव, त्यास लेखामिने कादो मंजे विश्वासू मित्र आहा लिविले, आपल्या समाजात आहा हांगीला जाते की कादो यो शब्द आपल्याला इतर समाज शिडव्यादो वापऱ्याशे, आन जर शिडव्यादो वापरतोते हायदे ते मग आपलो समाज "विश्वासू" नॉतॉ गा का?, आपलो समाज नक्कीस खुब "प्रतिभावंत" हाय. आपल्या समाजाआ नाव आहास आपुन पुढे नेवोया..

ख्रिस्तोफर रिबेलो, सोकाळा

# संजावसॉ हन

आखाड मयनॉ खपलॉ आन जॅठ ठंगावलॉ. या मयन्यात रमेद मावली वाराला सुरवात जाली गा संजावशा हनाई याद पडातें. यास मयन्यात घराला पान्याई झड लागातें भगुन माडायो हावळॉ वळत्यात. तें कून नाळाय हाले कुटीत्यात, कारण पाहाळयात एकदा आव्नी जाली गा कय काम नहयासा, त्या करतान हाले कुटॉन त्याव काथॉ तयार करॅसॉ आन पाहाळयात ओट्योर बॅहॉन त्यायो लोळे करॅशो. त्या पासॉन हुंब करॅसा. त्या हुंब खाट गाथ्यादो, बैलाई पाग करॅदो, पैरॅई हडाख करॅदो वापरॅशे.

आनु का हांगॅसा. तिगाळा संजावसॉ हन आपुन कॉहॉ साजरॉ करॅशे. गावागावात हांशापरा वेहिमीनॅ गावशे आख्खे पोरे हस्साल जमॅशे. आन मंग कून हावळ्यो हाडतें, कून केळ हाड्या गॅलें. मंग जकले लागॉन वेहित मिनशामीनॅ एक खडॉ करॅशे. त्या खडयात केळ ऊबी करॅशी. केळीआ बुडामीनॅ हावळ्यो तकव्याशो. दी माळलॉ गा ती केळ पॅटव्याशी आन जकले पोरे "संज्याव गोमटी" अह्यो बोंबो करॅशे. आन त्यामीनॅ मीठा टाक्याशे. मीठा आगीत पडला गा तड-तड आवाज करीत मीठा फुटयासा. आख्खे पोरे वेहित ऊबी रेऑन नाशाशे, गानॅ बोल्याशे खुब मजा करॅशे.

अडे घराघरा मीनॅ संजावशा हना पकवान हॉयॅसा. ता पकवान मिंजॅ हिंगोळ्यो. हिंगोळ्यो कऱ्या करतान बायको आख्खो दोपार खप्याशॉ. सन्याई डाळ भिजात घाल्याशी, मिंगारा सुल लाव्याशी आन तपयलीत ती डाळ बाफ्याशी. बाफलेली डाळ ऊळकीयॅ ऊप्याशी. परातीत घॅऑन तांब्याय मॉड्याशी. मंग त्यामीनॅ खवलॅलॉ नाळ आनु गॉड घाल्यासा. त्या पुरान करॅसा आन मैदया पिठाई गूळनी वळॉन त्यात पुरान घालॉन हिंगोळ्यो करॅशे. काईक लोक हिंगोळ्यो सुलियोर भुज्याशे तर कईक कडोल्यात तळॅशे. संजावशा हना दिहा हांशापरा घरात स्वयपाक हॉयॅसॉ नाय. हिंगोळ्यो खाऑनुस वेळ भागव्याशी. गावात कुना घारा दुख जाले हायदॅ तें पावने-गावशे यादरनॅ त्याई वाटनी हॉयॅशी. कतें कतें ज्या घारा केल्यात त्यापेक्षा दुखी कुटुंबात घन्यो हिंगोळ्यो हॉयॅशो. ई आहा गॉड धॉड करॉन-वाटॉन–खाऑन संजावसॉ हन साजरॉ करॅशे.

■ सेबेस्टिन डिसोझा, सोजआळी

---

# बाबुकाका आन मरी

खूप दिहापासून बाबुकाका जाम वैताग्लॅलॉ हॉतॉ... इ शिमा लक्षात आलता... पण विसऱ्याशी सोय नोती... कारन विसारला गा बाबुकाकानॅ दोन -शार बॉम्ब टाकीलॅस... पण मित्र गनाय, त्याला रॅवाल नाय नि शिमा नॅ एक दि हान्सा त्याला विसारलास...

शिमा - कारॅ बाबू का झालॅ रॅ.. ऑडॉ वैताग्लॅलॉ क दिखाता... (दोनदा विसरॉन जाला तीगाळा उत्तर आला)

बाबुकाका - आरॅ का हान्गॉ रॅ... आरॅ १५ -२० दिहापासून काय वॅग्ळास सुरु हाय मा घरात.. आरॅ मॅ विसारतें एक गा आन मरी हान्गातें दुहरास... माला वाटला कि तिनॅ आयकीला नायदॅ पण नाय रॅ इ आहा हाकोटे उठल्यापासून तें राती निज्यापोत ई आहास सलतें...

शिमा - आरॅ मंग रॅ.. डॉक्टरला दावड्योता ... काना डॉक्टर दरी नेवता...

बाबुकाका – गोट्या डॉक्टरला दाखडला.. मंग बंग्लीयॉर जावॉन काना डॉक्टरला पण दाखडला.. तें हांगात्यात कि कय त्रास नाय... सगळा ठीक हाय मनून... मंग मा हरीस इ आहा क वागातें...

शिमा - आरॅ अपुन अन्द्र्याला भॅटॉ, तॉ मम्बय इस्पितळात्षा बऱ्या डॉक्टरशी भॅट घॅवॉन देदॅ आपल्याला ...

मंग १ -२ दिहानंतर बाबुकाका नि शिमा अन्द्र्या घारा त्याला भॅटया गॅलें... बाबुकाकानॅ त्याला सगळा सविस्तर हांगीला... सगळा आयकॉन जाल्योर अन्द्र्या थॉडा थॉडा लक्षात आला (मम्बयशा इस्पितळात अहल्याव यॉ फायदॉ)

अन्द्र्यानॅ थॉडॉ विसार कॅलॉ गा आन बाबुकाकाला एक उपाय हांगिलॉ... "मरीला जरा लांबनॅ हाक दे, जर उत्तर नाय आला ना तें जरा पुडॅ जावॉन बग, तरी पन उत्तर नाय आला गा अजून पुडॅ जाय, जॉपर्यंत तुला उत्तर आयकॅदॉ ये नाय तॉपर्यंत पुडॅ जात जाय.... पन आवाज कमी पाय... बोंब नाय मारॅशी...

दुहऱ्या दिहा बाबुकाका ११ .०० वाजता ओट्योर पेपर वाशीत भॅलतॉ तडनॅ त्यानॅ मरीला हाक मारली "मरे जिव्या का ला कॅलॅ?" पन उत्तर काय आला नाय... नंतर याला अन्द्र्याव सल्लॉ आठवलॉ... तहॉ बाबुकाका उठलॉ गा नि हॉल मीनॅ आलॉ आन मरीला

विसारला "मरे जिव्या का ला कॅलें?" पन उत्तर नाय.. यो थॉडॉ पुडॅ ओहरीत गॅलॉ आन हाक मारली, "मरे जिव्या का ला कॅलें?" तरी पण उत्तर नाय.. मंग यो शेवटी सुलीपुडे खिरलो, मरीआ मांगे ठभी रॅलॉ नि तिला विसरला, "मरे जिव्या का ला कॅलें?" अडे मरीआ डोखा सटकाल्ता... ती खेकाटली बाबुकाकोर " कान फुटलॅ गा का, शारदा हान्गीला बुम्बला कालवण कॅलॅ मनून.." तात्पर्य - कते कते आपुन ठगाच दुहऱ्या माहनाला नाव ठुवित्याव... आपल्याला वाटाते कि त्याला कय कळे नाय पन दोष आपल्यातूस आहते नि इ आपुन लक्षात घ्याव नाय.... आपुन आपले दोष दुहऱ्या माहना आंगोर टाकीत्याव....

-- एडवर्ड डिसोझा, सोजआळी

---

# "आन अन्द्र्याने शेवटी कुपाऱ्याइस पोरी केली....."

आपल्या अन्द्र्याव स्वभाव मंजे एकदम, एक नंबर (हा, कतॅ कतॅ दोन नंबर शॅ कामॅ कऱ्यासॉ. गुपचूप केळीये खॉलॅ, लॉगरा, आळूये पानॅ सोरने वगैरे. पन एकदापन हॉकरॉ हापडलॉ नाय). महानु तॉहॉ जाम भॉळॉ. पण हैऱ्याबाबतीत थॉडॉ त्या गाडा जड पडलोता. तहॅ अन्द्र्याला ओबडॅ निरोप येतॉतॅ...पण अन्द्र्या कय मन भरीत नॉतॉ. त्याये बरेस कारनॅ होतॅ. पण एक महत्वा कारन आहा, त्यावॉ गावामिनसॉ बामन मित्र, गजाई बेन, ठषा, त्याला आवड्याशी. मंजे ओडी ना कि बॉल्यादॉस नाका. अन्द्रयाला मावऱ्यायी जीव्याशी जाम आग. पण ठषाने "अन्द्र्या, उद्या हान्शापारा दिवाळी 'सणाला' शेंगदानायी ठसळीये जीव्यादो ये हा' आहा हांग्यासा खोटी बास, गा अन्द्र्या पापलेटश्या मावऱ्या ताटोरने ठठॉन तडे गॅलॉस पाय. म्हंजे बगा !

एकदा त्यावॉ खास जीवासॉ दोस्त, बाबुकाका, त्याकरतान एक मस्त निरोप घेवॉन आलॉ....'अन्द्र्या, मा बायकुनॅ, तु करतान, एक मस्त निरोप हाडलॅ रॅ'...अन्द्र्या: "कडसॉ रॅ?"....बाबुकाका "थांब...बायकुनॅ जहा हान्गिलॅ तहा आठवॉन हान्गातॅ"...आहा हागॉन, बाबूकाका एक मिनटभर थांबलॉ गा, आन मंग अन्द्रयाकाकाला हान्गातॅ..."ति तुआ महाबेनिया फु-बायश्या डेरानीइ नातनी"...अन्द्र्याकाका पटकन बाबुकाकाला हान्गात्ते..."गरे, ई ऑडा बोठ्ठा जडसा कॉडा हॉडविता हॉडविता, मे जी पावशेर घेटलॅ ति पण उतरदॅ रॅ...ई कय माला हुमज्यासा नाय"...बाबूकाका: "माला पण हुमजाला नॉता...मॅ मा बायकुदरनॅ ई लाम्बा-लचक नाता लीवॉन हाड्लोता बग"...आहा हागॉन त्यानॅ त्या हातास्सॉ कागदावॉ तुकडॉ दावडलॉ ...मग थॉडॉ वेळ जालॉगा आन अचानक बाबूकाकाला कयतरी link लागली...."अरे तॉ बॉठ्या हॅताश्या बावखालामॅरसॉ, तॉ फेस न काढता बीअर झटकन ग्लासामीनॅ खाली करतॅ तॉ"...अन्द्र्या त्याला मिनेस थांबवीत "आरे तॉ पिल्योर लागली गा, रडात भ्यातॅ तॉ फिल्यो आ?" बाबूकाका: "आतॅ कॉहॉ पटकन ओल्खिलॉ बगू".. मरीपेक्षा आपून पटकन ओळखिला ता बगॉन दोघांना जाम बरा वाटला. बाबूकाका पुढॅ बॉलतॉ जालॉ, 'हा, तर त्या फिल्यायी ई पोरी. तीवॉ निरोप तू करताना आलॅ. एकदम सरळ वळनायी हाय. भाटश्या आन घराशश्या कामात एकदम 'गॅट' हाय'...अन्द्र्याकाका बाबुकाकाला मिनॅस थांबवॉन, 'अरे ता सगळा ठीक, पन बाबूआ, माला एक हांग, पोरी जर सरळ हायदॅ तर तिला वळान कहा हयासा आन जर तिला वळान हायदॅ तर ती सरळ कही रॅ?"...आतॅ ऑडॉ valid प्रश्न बाबुकाकाला कतॅस पडलॉ नॉतॉ. आन तो प्रश्न पन त्याला हुम्जालॉ नॉतॉ, पण अन्द्र्याने कयतरी एकदम भारीस विसारलॅ ई त्याला कळलॉता. "आपल्याला 'गॅट' सलदॅ पण 'chapter' पोरी नाका" अहो आणखीन एक sixer मारॉन अन्द्र्याकाका कुदळ खान्योर मारॉन बुडॅ वर सडव्या गॅलॉ.

पण बाबुकाकाला खरा कारन मायती हॉता. त्याला मायती हॉता कि त्या बामना ठषाकरतान यॉ यॅ सगळॅ नाटकॅ करतॅ मनून. त्यानॅ विसार कॅलॉ कि, याला मरीस हारका समजावू शकातॅ. बाबूकाका अन्द्र्याला हानसा घरा बॉलवितॅ. अन्द्र्या येतॅ. बाबूकाका ओट्योर हिंदाल्यात बॅहॉन त्याईस वाट बगीत हातॅ. तॉ अन्द्र्याला आतमीनॅ सुलीपुडॅ मरी दरी धाडतॅ. पास मिनटे हवात्यात गा नाय तॉस, अन्द्र्या बार ओट्योर येतॅ आन, बाबुकाकाला हन्गातॅ, 'बाबुओ, मा त्या फिल्या पोरीला 'हा' हाय रॅ. तडॅ तू निरोप धाड'. बाबूकाका एकदम ताडकन हिंदाल्यातानॅ ठठॉन एकदम डॉळॅ बॉठ्ठे करॉन त्याला बग्या लागातॅ. तॉ विसार करतॅ, मॅ ओबडा व्यवस्थित हागॉन यानॅ मा ऐकिला नाय. आन मरीनॅ आहा याला ५ मिनटामीनॅ ऑडा का हांगिलॅ हायदॅ. बाबूकाका पटकन आतमीनॅ आलो. मरी हिबा घॅवॉन धान वाळया लाग्लोती. तॉ बॉयलॉ, 'मॅ ऑडा समजाविला तॅ मा ऐकिला नाय. तू ऑडा ५ मिनटात त्याला का हांगीला?'..ती बोय्ली, 'मॅ त्याला ऑडास बोय्ली, पोरी कून करॅ ती कर, पण एक ऑडॉ विसार कर, तिला आपला आमटास्सॉ रस करता येतॅ गा ता बघ. रॉज डाळ-भात, ठसळीये कॉडॉ रॅ जीवीदा. कतॅ तरी तुला नुसता घरसा आमटास्सा काल्वान, हुक्क्या बुम्बला जीवना, मावरयाओ रस खा वाटॅदॅ गा नाय. जिला ई सगळा करता येदॅ ती हरीस लगीन कर. तुई बय रॅवॉन रॅवॉन कोडी ज्याशी. रंगात यॅवॉन भांगात जावो नाका'. आपल्या बायकूनॅ अन्द्र्याला दिलॅलॉ यॉ जवाब ऐकॉन बाबूकाका तॉडात बॉट घालॉन चूपचाप ओट्योर यॅवॉन भॅहलॉ. 'जिव्यादो का कऱ्या लाविलॅ?' ऑहॉ तिला ऑर्डरमिनॅ सवाल कऱ्याशी पन त्याला हिम्मत नोती....

--- डॅनिअल फ्रान्सिस मस्करनीस, वाघोली

# कॅनडातनॅं कादोडीला पत्र

माये विसार मांड्याश्या अगोदर थॉडॉं परिचय करॉन देतॅं. मॅं गेले चाळीस वहरॅं परदेशात (कॅनडात) हाय. एकून तीस-चाळीस कादोडी बॉलनारॅं मा जवळपास हात. त्यापैकी कय मा अगोदर आन बरेचशॅं मानंतर अडॅं आल्यात. गेल्या दा-पंधरा वहारात जे आल्यात ते सगळेस आमश्या हारखी कादोडी बॉलू शकात नाय. जे बॉलत्यात त्याबद्दल आमाला अभिमान वाटातॅं. मॅं मशादतडश्या फिलपामास्तरसॉं दोन नंबर पॉर, मायीपान आतॅं साठी उलटालॅं. इ पत्र वासनारॅं खुब थॉडॅं लोक माला ऑळखेद्यात कारन बहुतेक तरून मंडळीपर्यंत यॅं अंक पॉसनार. खरा मंजे त्यांनास यॉं प्रश्न हॉड्व्यासॉं हाय, त्याइस या कामात पुढारकी कऱ्याशी हाय.

आमॅं परदेशात रॅनारॅं, आमश्या पॉरांना आमॅं नाय कादोडी नाय मराठी हिकवू शकलॅं, त्यायी आतॅं खुब खंत वाटातॅं. पन त्याआ कारन आमाला लाज वाटातॉंती आहा नाय. पन आपल्यातडॅं लॉकांना आपल्या भाषेयी लाज वाटातॅं. यावॉं अनुभव आमॅं जिगाळा जिगाळा घरा येत्याव तिगाळा आमाला येतॅं. आमाला धास्ती वाटातॉंती की आपली भाषा लवकरूस नष्ट हॉनार. पन तुमॅं जी येई सळवळ सुरू केले ती बगॉन थोडी आशा वाटातॅं.

परदेशात आल्योर भारताशोस नाय तर जगाश्यो खुब खुब भाषा आयक्यादो मिळात्यात. कयी भाषाओ आवाज, उच्चार (न समजनाऱ्याला) ओडॅं विचित्र वाटात्यात पन जे समजात्यात त्यांना त्याआ भाषेबद्दल कॉडॉं अभिमान हाय ता दिखोन येतॅं. मग आपल्या कादोडी लोकांना क्यायी लाज वाटातॅं? आतॅं तुमॅं तरून मंडळीनॅं बस-गाडीत आपली भाषा बॉल्यादो सुरुवात केली तर इतर कादोडी लॉकातनॅं हळूहळू लाज कमी हॉयदे आहा वाटातॅं.

अरे, गेल्या वहारा आमे स जने, कादोडी बॉलनारॅं, मोम्बयश्या विमानतळोऱ, विमानात बेहाश्या अगोदर "वेटिंग एरिया"मिने होतॅं, आमश्यो कादोडीमीनॅं गप्पा-गोष्टी रंगल्योत्यो, आजूबाजूये लोक विचित्रपणे आमश्योर डॉक्या लागले गा एक-दोन इंग्लिश मिने जोक्स मारले गा त्याये तोंडे बग्याहारके हॉतॉतॅं.

थॉड्क्यात हांग्यासा मंजे आपली भाषा टिकवॉन ठवन्याकरता तुमॅं सालविलेल्या खटपटीबद्दल तुमशे कवतीक करनॅं अगदी रास्त हाय. बरा मग......

--- लुईस फिलीप मचाडो, सार्निया, ओटारीओ, कॅनडा

---

## इटलीतनॅं शुभेच्छा

मॅं फादर मायकल फर्नांडिस (आपल्या फर्नातडसो). मॅं तुम्सॉं कादोडी अंक वाशिलॉं. अंकाई मांडनी खूप सुरेख हाय. आपली कादोडी भाषा आनी संस्कृती जपन्याकरतान तुमॅं सुरु केलेल्या या कार्याला मायॉं शुभेच्छा. मला आशा हाय, कि या उपक्रमामुळॅं आपल्या अडे कादोडी भाषा जास्तीत जास्ती लोकामीनॅं बॉय्ली जायदॅं. तहास आपलॅं सगळॅं कुपारी आपली भाषा टिकवन्याकरतान आपल्या परीनॅं प्रयत्न करद्यात अही सुद्धा अपेक्षा ठवितॅं. प्रभू येशुओ आशीर्वाद तुमा सगळ्यांवर येवो ईस प्रार्थना.

फा. मायकल फर्नांडिस, 'Collegio San Lorenzo da Brindisi', रोम, इटली

---

# भागिओ भैसॉं किलवॉन जास्सॉं

गावात भागीया बावखालोर, आठ दा झाडॅं सिश्याये हात. एकाई बोटूरली गा, एकाई किडकी पान गॉड, दोन शार झाडाई सीस माहाळ आन आम्बाट सीस. गोडी सीस नुसती बॉलता सल्ता खाशी. पर्शा वहरापेक्षा यंदा का हान्ग्यासा सिश्या झाडाला पान दिख्ये नाय ओडी सीस भरलॅं, कय बोलासा नाय. दा पंदरा गुणी भरद्यात. काश्या गावाला गेलॅं. तोपोत सीस झाडोरनॅंस अर्धी होये. वारा कॉडा हुटलॅं. धपाधप सीस पडातॅं. हाकोट्येस दोगी सोगी खारपाटल्याव बायको सीस बग्यादो आल्त्यो. त्याई पान झाप भर तुकिली आन गेल्यो. त्यातूस पोराई परीक्षा जालॅं आन हुट्टी आलॅं मंग कय हान्ग्या पाय! होल्पाटिये पाडत्यातून बोरावालीया सवादी घालत्यात. अडनॅं तडनॅं भागीदार हाको मारत्यात पॉराना, पान कय केल्या आय्कातूस नाय. पोरे खेळता खेळता पडल्येल्या सीशाव पुंज करॉन थोवित्यात, आन पोराई नंदार कही "सॉराई नंदार बोस्क्योर तही या नंदार बोरावालीओर बोरे खादो" खाद्ये पोरे नुस्त्ये. बोरवाली बाय येतॅं कतॅं आन बोरे उटीत, झुग्ल्यात, टायलीनीत घ्यादो

बोरवालीआ मॅरॅ भ्यात्यात कतॅ. “बाय दोन बोरे दे ना, दे ना, ओडेस आ, मॅ टोंगाळेय दिल्ये तरी पान मला ओडॉरे. तिने बुडकी बुडकी सीस दिली तिला ओब्डे”. बोलता बोलता बोरवाली नंदार सुकवॉन बस्को मारॉन धाव मारली वरती बी कां उद्या ये बास....... उद्या ये बास. आहा करता करता दीहासॉ दी भरलो पान पाड्नारॉ कुन येस नाय.

पाश्या ओ गा आन बुजी ओ, यो दोगी नवऱ्यो पुर्मुशी हात्, त्याना सीस खाशी होत्यी या दोग्गिया तोंडाला पाणी हुत्ल्ये पान हाडोन कुन देद्ये. सोरेसारे पॉराना हाको मारत्यात, पान पॉरे खेळात गुत्ल्यात तरी पान कुणा तरी काना आला सांतानवैनी हाक मारत्यें, कादो हाय्ये, “पॉरा दोन तीन गुरबाल्याशिशाय टोंगळे हाडोन ये.

दुहरया दिहा काश्या नेम्कोस हाकोटयेस आलॉ. मॅ हाक मारली "काश्या कडे साल्लॉ? आम्शी सीस पाड्याशी हाय का करता?" यंदा आमॅ पाड्याशी सीस ई भागीआ खटला हाय. तहॉ काश्यानॅ खाला मुंडी घालॉन हान्गातॅ, "शेटश्या घारा बोलविलॅ तडे जावॉन येतॅ". "जाय पान पुना ये हा आम्शी सीस पाडयाशी हाय शेटला हांग बास." काश्यो परत आलॉ, "कां हान्गीला शेटनॅ?" "कय नाई थॉडा काम हाय पान उद्या करनॅ" काशाला गळ घायली आन हान्गीला आज आमसा ऑडा काम कर सीस पाड. काश्याने हिवळ वाजविले तहे सिमनी गा दोनू पोरे मार्तीन दरी बोलातोत्यें त्यें हालात डोलात हातात आकुडी, आखा आन पिवशी घ्येवोन आलॅ. काश्या मान्गोमाग सिमनी आन दोनू पोरे निन्गाले. "काश्या ई कां करता सरळ निगालॉ तॉ?" काश्यानॅ आडॅवेडॅ घेवॉन हान्गीला "आज नाय जम्यासा. दोन दिहान आलॉ. आज माला पत्याघरशी सीस पाड्यादो बोल्विलॅ. मॅ तडे साल्लॉ". "काश्या तडे उद्या बिद्या जाय. आज आमसा काम कर. पोरे आय्कात नाय भगुन आन वारा पान हुट्लॅ सीस पडातॅ बग धपाधप. तु कां घ्यासा त्या घॅ" हान्ग्ता खोटी.... "वाडी देदा गा"... तहा हान्गीला "देनॅ पान आजूस सीस पाड." कहॉबाहॉ काशो तयार जालॉ. तोपोत नऊ वाजलॅ.

"काश्या तुला माईतुस हाय आमसा सगळा खटला भागीआ. कुनुस पुढाकार घ्येनाय." हान्गात्यात ना 'भागिओ भय्सॉ किलवॉन जासॉ'. "पाडनावाळ कां पायी, सीस गा पैशॅ?" काश्यानॅ डॉखा खाज्विला आन खाला मुंडी घालॉन हान्गीला, "सीस पाये" आन कश्या हान्गातॅ "जिवान आन दोन गुनी सिशायो लाग्याशो." मॅ हान्गीला सल्ये. दोन गुणी सीस घॅ पान सीस पाड. काश्या सीस विक्यासी गा, विक्यासी हाय्ये तॅ मॅस ठविनॅ. मा बेनीला पाय. सल्ये, काश्याई एक अट हाय. आतॅ बी का पाय. कारॅ काश्या कां पाई गुनी गा? काश्या हन्गातॅ नाय नाय “बावखालोर त्यो हगील्याव गुंड्यो गा राही हात तडशी सीस कुण तुकीये. मा पोरे आन बायकू तडशी सीस तुक्याश्ये नाय. काशा हान्गातॅ, “तुम्श्या लोकाना कलेस नाय बग, असनॅ भोटये गव आन बायको पातेरात्शे उठत्यात गा आन टमरेल घेवॉन साल्ये सिशा बुडा. एकेका राहिओर माहाट कॉडा घोन्गातॅ ता बगा. ई सीस तुमेस खासी ना? या पेक्षा आमॅ वारली बरॅ गटारात नायतॅ हिवारात जात्याव. मॅ आईकील्या नाआईकीला केला आन सिमनीला हान्गीला ऑ खराडॉ हालतॉ घॅ गा त्या गुंडयाई एक राहा कर तोपोत मॅ पात्यो गा कांड्याईपेटी आन आगिओ इंगळ हाड्तॅ, पेटवॉन टाको गा खुराबाये गोंटये आन बारदाने टाको. मंग सीस टूक्या बरा हॉयदॅ.

मॅ आतॅ मा काकहऱ्याला आन त्या घरशाना निरोप देतॅ. मॅ जावॉन दुम्ज्याभावल्याला आन इजालबायला हान्गीला सीस पाड्या काश्याला दिलॅ. दोन गुनी घॅ तॅ घेडंदे. त्या हगील्या राहिओरशी कुण तुक्या जाई? दुमज्या भावल्याने तॉडगॉ काड्लॉ, काश्या तुला माईतुस हाय, आमॅ भागीदार कोडे. सल एका गुनिओर भागोव. जीवान पान देतॅ सला पाड्या लागा. तुस तॅ दर वहरा पाडोन देता अर्ध्या गुणित. काश्यो कय केल्या आयकॅ नाय दोन गुनी पात, माग्वय कोडी जालॅ आमाला पान जीव हाय ग नाय, माये पान शार तौंडे हात. दुम्ज्याभावल्यानॅ तॉडगॉ काड्लॉ दीड गुनिओर, तहॉ काशो तयार जालॉ सीस पाड्यादो.

बरबर नव वास्ता सीस पाड्या सुरवात केली, तोडयातूस दोगी बोरावाळ्यो बायो आल्यो आन लाम्बुस भेल्यो. त्याना हान्गीला, तुमॅ आज अडे भ्येओ नाका पान कय केल्या आईकातूस नाय! शारदा पळविल्यो, पोरे अटनॅ तटनॅ सीस पळवॉन बोरे खात्यात पान भागीदारास्शी एक तरी बार उतरलेगा, नाय? माई जळभुज आन रगाजळ कोडी जाली. इजालबाय लाम्ब्ने डोकायतॅ पान आड्डातॅ तरी गा. सगळे माई मजा बगीत्यात. हाहुला हान्गीला डोख्योर हुडकॉ घ्या तडये भ्या. नुसता पोराना आड्डा बास. अय पोरांदो कोडी सीस वाईद्या! येव गा बोला, तुम्शा आयला मायला करीत हाऊ उठली तहे पोरे पळालॅ. पान बोरावालीबायन्ये पिवशी भरॉन सीस जमविली तिने हादविला. बोरे हाडल्योतॅ तॅ टोपल्यात दिखात नोतॅ आन सीस कोडी साल्विली बग आखा टोपला भरॉन.

सिमनी गा दोनी पोरे लागले सीस तुक्या, काश्या होलाट मारतॅ बास आन सीस पाडातॅ बास. लगोलग सात गुनी भरल्यो. काश्या आकुडी तोकडी पडातॅ, यंगा कोडी हाय बग, डाळ हालव, डाळ हलविली आन काशा टोकोर सडलॉ. दोपारश्ये बारा वाजल्यात. काश्यानॅ डाळ हालविली, पान मा पोटात गॉळॉ आलॉ बगॉनुस, हाकोतॅस येनॅ जर्शी साकील्ती, वर सडये आन बुडा येदे गनाय. काशा बास कर रॅ. माय डॉळॅ घाबरात्यात रॅवुंचे तोडी. “सीडी मुंगी खाय तारू सुखी सलामती जाय” ज्या दरी

नाय त्यांदो रेवुंद्ये. ओबड्या उस्शोर सडॉन बुडा आलों तें नाय् ती गिरागत हॉयद्ये तू पयलों खाला उतार. काशा खाला आलों. गुनी कोडयो भरल्यो अकरा गा बी अर्धी पावनी जाली. काशा तुई दीड गुण तुक गा मेंरें थोव आन बिओ दा गुनी दुम्ज्याकाका ओटयोर नॅवॉन थोव. तरी पान बिओ दोन तीन गुनी भरद्यात ओडी रेली. आत्यें एक वाज्ल्ये जीवा गा मंग वाटणी-घाटनिला लागा. जीव्यादो हातोर्सा काल्वान, रात्या सावळा धान आन परसा आंब्या लोनसा होता ता दिला, हुतेऱ्यो सुलिया राखाडीत भूजील्त्यो त्यो दिल्यो गा, जिवान जाला आन जुरसा ओट्योरूस आंग टाकीला हावळीओर.

तीन वाज्ल्यात काश्या, सिम्न्ये गुनी होळा उलटयो करा. ई असनी भोटी राहा पडली सिशाई. त्यद्यो सगळ्यो बग्या लागल्यो. कुण मिन्गारनें, कुण कुडा फटीतनें, कुण दारपुडनें. मनी कतिला हान्गातें कतें कोड्यो गुनी जाल्यातु. कती हान्गातें अकरा. आहांगा, खूप सीस पडली. बाये बाये करीत खुनि कऱ्या लागल्यो. इन्ये पाड्या दिल्ती ना मंग कई तरी काळाधवळा/घालघसर केल्यी. माय कान होतें यो कां बोलात्यातु, में आयकिला. तह में ताँड उगडला आन बोय्ली पुडेस्कारी करत्ये त्याला आय्क्या लागातें. तुमें आक्खो दोपार तंगडे वर करॉन निज्ल्यो आन आतें अटनें-तटनें तोंडाई बाफ कादो घाल्वित्या. में कय एकटीनें सीस पाड्या दिल्यी नोती, दुम्ज्याभावलों गा इजाल्बाय यांना हान्गोनुस दिल्त्यी. सिम्निया कानात हान्गीला तुला एक जुना लुगडा देनें आन पोराला जुन्यो शेड्यो, तुमानी गा खामिशे हात तें पान देनें. तीगळा सिम्निनें काश्याला तयार केला, आन काश्या तयार जालों, "तुमाला का माईत हाई. परशा वहरा तुमें सीस पाडली तें तुमें दोन गुनी लीकवॉन थोविल्त्यो ता कई भागीदारांना माईत पडला नाय गा कां? "आपला धाक्यासा आन दुहरया उगडा कऱ्यासा" ई आपली दानत आन खोटी हवय कय जाशी नाय. "सिसो खाता दी गेलें आन हान्गातें वाकड्या फळा नाव कां?" माला हिक्व्या लागल्यात. आतें बिये भागीदार जमले. आतें आल्या तें तोंडे बंद थोवा, झगड्या नाका लागों. शिशा मुळाला दोर नका घालों. सात हिश्याशा एका हिस्श्यात दाव्या हिश्याई मालकिनी पान ताँड कॉडा सलातें बगा.

काश्या आतें तुस वाट्ये कर. दुम्ज्या आन घोश्या दोगे आले वाटणी कऱ्या. काश्या आदी शार हिस्श्ये कर, एक मोड तीन कर आन या तीनोर टाक. एक हिश्यो मन्याला (मन्याय हिशे तीन तो करद्ये), आन ऐकाय शार आन त्येशो एक मोडॉन तीइओर टाक, नानाकाकाला एक, मरशे तुक तुओ वाटों, ती फरशी कडें गेली हाक मार नाय्तें येदें बोम्बाट करीत. एक गाव्काऱ्याला (याय नव हिश्ये कऱ्याशे) जाली वाटनी. अय बुजी आन इमू भाहालीती. आत्ये सग्लोर्शी बस्को बस्को तुका गा दोन वाट्ये करा नातें कय खरा नाय. ऑ देवा या दोगिया नाव काढता खोटीस आल्यो बगा हालत डॉलात खांद्योर हुडकों आन हुप्डा घेवॉन. या दोगीआ वाट्याई एक हुप्डा या नाय पान याई आक्खा झाड हालवे लो. माला घाम हुटलॉतॉ, हुडक्याय पुहीलों या दोगीना बगॉनुस. आम्शी वाटनीला, हाय हाय तुम्शी वाटनी कही भायान्याव. में पानी मारलों, बुजे इमू तुमें ऑडों उहरा आल्योत्यो. पान कय केल्या आय्कात नाय. आमाला न विसारता तुमें सीस कही पाडया दिली. तिहऱ्या हिश्यासॉ पासवॉ हिस्सॉ आम्सॉ हाय. वये वये, आतें रगडा मा मेंरें आला. माला बुजी हान्गातें तू कत्याई पुडेस्कारणी जाली. बुजे धीर धार में दुम्ज्या भावल्याला आन इजालबायशा काना घालॉनुस त्याईस सीस पाड्या हान्गीली. तहा बुजीनें आन इमुनें तोंडोर हात धरलों आन बोल्याशो रेल्यो. ई तुम्शा दोगीई वाटनी दोनू वाट्ये घ्या तुकॉन. तुमाला पाय्हाद्ये तें मा वाट्याशी थोडी घ्या. बुजिया मन पॉट भरला मा दर्शी शिस घ्या हान्गीलीना? वाटनी करता करता पास वाजलें. सिम्न्ये सीस विके गा. मा शिसोडीशा बेनिला पावोती में तुला सीस पाड्याश्या आदीस हान्गीलाता ना. त्या मेरॅस तुमें रेत्या ना? का घ्यासा त्या हांगा, अडश्या अडेस पैसे देतें. सिम्नीने हन्गीला, "त्येला इसार", काशा का? तीस रुपय. सवदों जालो २५ रुपाला. पिर्विटाई बटविश्ये मोजोन २५ रुपय काढले गा दिले. आन कास्श्याला हान्गीला ई गुण घेवॉन जाय मा बेनीआ घरा ती तुला पास रुपय देदे. मा वाट्या आली तीन झाप. दुहरया दिहा हाकोटेस होक्ल्या घेतली, होकयली गा निंबरा हुकात घाय्ली. आन जुरसा आंग टाकीला तें कां पोरायी सीस सॉरॉन कमी केली. शा पिलों गा आन दोपारशी सीस काटोळळीई. सिसारें मोडक्या हारवल्या टोपल्यात भरलें. जाकू सन्यावाला आला गा त्याला द्यादो. परसा गाहासा मिठा होता ता उखळीत कुटीला आन थाळ्यात घेवॉन शिस्याव उन्डो बांदिल्यो. मुजीत परशी काळी सीस होती ती काढली आन तीसेक नव्यो उनद्यो खाला भरल्यो तोयोरन्ये जुनी सीस भरली. शिशा काम जाला. वाटनी घात्री जाली आन सीस पान भरली पान ई जळभुज नाकारे बाबा. हान्गात्यात ना भागिओ भय्सॉ किलवॉन जातें में पुडें पडया नोती तें सीस कय केल्या पडया नोती.

में साल्ली विराडश्या हुकुरवारा बाजारा..... शिशायी मुजी हाड्याडो... तोपोत तुमें उंडयो करॉन थोवा ........

■ तेरेजा थिओफिलो डिसोजा, कांदोक नं. १, ९९७५३९१५६९

# “आबोरशी डोकरी”

आमश्या बाठात राट हॉतॉ. आतॅ तॉ तडॅ नाय, पन राटाऑ गठ्ठॉ अजुन तॉहॉस हाय, आन् तीस एक त्या राटाई खुण हाय. त्या मॅरॅ बाव, बाईआ बाजुला एक जूना बावखाल आन् बावखालोर मोडकी भेंड हाय. लान-पानी तडॅ पॉहना, बाझूक, मावरा पकडना, मॅर-दारशे आंबे, शीसो, नाळ, अननशे, शकुतरे (पपनीस) पोपय, फणस पाडना अहे बरेस उपद्व्याप कॅल्यात. ते तहे त्या काळात जकल्या गावश्या पोरान कॅल्यातुस.

त्या दिहा आयत्वारॅ दॉपारसॉ मॅ बाठात बाविश्या मॉडक्या कठाडयोर बॅहॅलतॉ, जुन्या दिहाशी याद करीत. सहजुस वर लक्ष गॅला आणि का हांग्यासा, अचानक ‘आबोरशी डोकरी’ मा नंद-या पडयाशी गा! डोकरीला बगीता बरोबर मा मनाला हॅंवसा वारा लागला. तही तीगाळा शाळीतश्या दिहा ‘आबोरशी डोकरी’ ब-यास वॅळा बॅठयाशी पण आतॅ ती कडॅस बॅठॅ नाय. पन आज मात्र जवळ-जवळ २०-२५ वहरानंतर अचानक बॅठली. खूप बरा वाटला. डोकरी आबोर फीरातोती, मॅ तीला हाळी दिली, तही जुरुकक्षी खाला आली, आमशी खबार-बात जाली आन मग मे मा गराना ती दरी मांडीला.....

आबोरश्या डोकरे, आला जरा मनोर घॅना,
हांज्याला धडाम-धुम, रातीला समाक ना,
वैसाखाआ मैन्या, जमीनला कोरड पडलॅना
आबोरश्या टिमक्याला, तू धो-धो धाडना,
आबोरश्या डोकरे, आला जरा मनोर घॅना....॥

बावी हात त्यो आटल्यात, बावखाले हुकल्यात
राटायों बांडयो आतॅ, जडश्या तडॅ थांबल्यात ॥

कुदळी-पावडॅ आमश्या, मींगारा पडल्यात
राना-हिवारात आमश्या, उंदुर खुड-बुडल्यात ॥

जॅळा-मोडीला आतॅ, पडॅ नाय उडी,
तेरिआ आळू, कुनुस नाय हाडी ॥

आंगळयातश्या पान्योर, तरॅ नाय होडी,
याद येतॅ तुई आमाला, आतॅ घडो-घडी ॥

डोकरी पटकान हांगातॅ

“मातीए कौले तूमे, थॉडक्यात फुकीले,
लाकडी घरे तुमाला, कवडिमोल जाले” ॥

“हिरवे झाडे पाने कापले, रस्त्या लागल्याले,
१५”-२०” शे गाळे तुमशे, तडॅ उबी रेले” ॥

“बावखाले अल्लम्मत, तूमे गुंजविले,
तडॅ तुमशॅ बॉठ-बॉठ्ठॅ, बंगलॅ उबारले” ॥

“मुठमाती दिली तूमे, आंगळयातश्या दॉडयाला
सीमॅट कॉन्क्रिटसा तडॅ, कॉबा आला” ॥

“सीमॅटसो स्लॅब तुमसॉ, आडवॉ आलॉ
कौलातसॉ दरवाजॉ माऑ, बंद जालॉ” ॥

“टी. वी.– कंप्यूटरला, जकले पोरे डकले,
‘येरे-येरे पावसाला’, सब्बन बाहाले” ॥

“पैशा हरी हैरा, तूमे जोडला,
पूर्वजान जोडल्याला, सूत आपला,
मा वर पाठ फिरवॉन, तूमे तोडला” ॥

“प्रेम आतॅ आटया लागलॅ, तुमसा मा वरी,
कॅला धाडॉ आतॅ ‘टीमक्याला’, धो-धो तुमश्यादारी....?” ॥

**----** राजन डिमेलो, आगाशी

---

## बटर

मंडळी, आयतवारॅ हाकोटसा लवकर उठया नाका मनून शा प्यादो बटर हाडलोतॅ .प्यॅल्यात शा घेतलॉ आन त्यामीनॅ दोन बटर हळूस होडलॅ तो तॅ शामीने रुबाबात तऱ्या लागलॅ. त्योर जरा बळजबरी करीत बॉटाय दाब दिलॉ, तर तॅ नाराज हवॉन खाला बेहलॅ अन मा बॉटाला गराम शासो चटकॉ लागलॉ. बॉट पटकन तॉंडात घायला. बटर गॉड शामीनॅ आन मा मन लान्यापनाशा गॉड आठवनीत बुडॉन गॅला.

बटर यॉ माव लहानपनापासुन्सो जीवलग मित्र. आमशास नाय तर आपल्या समाजाशा बऱ्यास घरात हाकोटशा टायमात बटराइ हजेरी रॉजशी अहयाशी. यास दोन बटरा जोरोर आम्ही शाळेत आख्खॉ दि काड्याशे. गावातशा गरीब घरात रातसा जीवान तर वगळ शा व बटर इस अहयासा. बुडत्याला काडीओ आधार त्याप्रमाने गरीबांना बटराव आधार इ आपून प्रतेकाई बगीलॅ व अनुभविलॅ.

खरातर बटर, जीरा बटर, मस्का बटर ये सगळे भावंडे. पन आमशा वाटयाला याशॅ तॅ बटर, कारन बटर दहा पैशाला तर मस्का बटर चार आन्याला मिळयासॉ. जीरा बटरसॉ तोपर्यंत जन्मपन जालॉ नोतॉ.

आत्यॅ सगळास बदाललॅ, बटराइ जागा अमूल बटरनॅ घेतले. मायी पोरी हान्गातॅ माला सपातीला बटर लावॉन दे. आमशी बय

हांगातें पोरे सपातीबरोबर बटर कॉहों खासॉ , तू शामीने बटर बुडवॉन खाय मस्त लागातें. दोघींना दोन बटरांमिन्सॉ फरक समजावॉन हान्गीलॉ तिगाळाकडे त्यामिन्सॉ वाद मिटलॉ.
बय हान्ग्या लागली आम्ही बारक्या पोरांना बटर हाक मारतोते आतें ताहा बॉलॉन सल्यासा नाय, पोरा बयांना राग येदें. मॅं बोयलॉ बरोबर हाय तुआ मत, जकलास बदलला. कालाय तस्मै नमः ओम बटराय नमः

--- एमेल आल्मेडा, सोकाळा

## मॅं यष्टी बस

यष्टी बस – हाकोटशी शारशी पईली गाडी पकड्यादो आल्यापासुन तें रातसॉ येक तास आरामाव हॉडॉन आपल्या जकल्या भाजीवालें, फुलेवालें, पासवालें, दूधवालें आन नोकरी धंद्यादो मुंबयला जानाऱ्या जकल्या लोकांदो शेवा हजर रॅनारी लांब्या गाडीनंतरशी यशटी बस कुटूंबाई एक लाडकी पोरी हाय. मा तूमें खुब कवतीक करॉन लाड करत्या भगून मॅं तुमशा जकल्याकरता वेळेयोर हजर रॅतें. हा पन माला तुमशा पोत न्यादो रोजसॉ नवॉ- नवॉ माहनू (डायवर) त्या दोस्ताला (कंडाक्टर) घॅवॉन येतें. ताहास मॅं पन रोजशी एकुस ठिकान न घॅता वेगवेगळे ठिकाने घॅवॉन तडशा माहनांना टेशनोर गाडी पकड्यादो घिती जातें. रोजशे नवे ठिकाने आन नवें माहने न्यासा हाड्यासा काम अहल्यामुळें बगिता येत्यात. नवा नवा हिक्या मिळातें. जकल्या परकारशा रस्त्याई, माहनाई आन त्या वागन्याइ माइति मिळातें. कतें कतें माइ तब्य्यात बिगाडली तें त्योर औषधपानी करॉन माइ काळजी घ्यादो माव नळडयो (मेक्यानिक) शोवीस तास हजर अहतें.
पन.... कतें जर मॅं हांगील्या ठिकानोर हांगील्या टायमाला माइ सुकी नाहताना आली नाय तें ! “बापरे” मंग ते जकले लोक घर डोख्योर घॅत्यात ताहा मा आंगोर खॅकात्यात का, उलटा-पालटा का बॉलात्यात, गाळी का देत्यात आन का का बॉलात्यात. ताहास हांशापारा घारा जाश्या टायमात जो पॅंडॉ पडातें ता जकला आयकॉन आहा वाटातें गा नाका यॉ माव भीक धं्दो. हॉडॉन द्या वाटातें इ जकला कामकाज. ताहा माला आजकाल तहेस सप्ने पडात्यात. कामकाज हॉडॅशें दी जवळ आल्यात आहा वाट्या लागलें. माला दिलॅलॉ “बहुजन हिताय, बहुजन सुखाय” मंत्र मा दरनें कायमसॉ निंगॉन जायदें गा का अहों मनाला घाबरॉ वाट्यादो लागलें.
कारण..! कारण मास कुटुंबात मा जिवोर उठणारी माइ हवतार बेन “जन्माला” या लागले. “नव्याशे नव दि” या मनिपरमाणे हवतार बेन “नवी नवलाई” नक्कीस दाखडदें. पन माला भाऑ नाका. “जुना ता हॉना” इ जुन्या वाड वडलाई मन फुकाट नाय हांगिली. तहेस आजकाल कुटुंबात बी बरेस नातोंडे-पोतोंडे (यामा, पल्सर, एक्टिवा) माहाबेंनी (रिक्शा डमडम) आल्यात. आजवर ज्यांना नीला-हाडला, ज्या करता हकोट-हांज धावली ते आज जकले या नव्या लोका मांगे लागल्यात. मनुन आन मनुंनुस मॅं आज मावले सायबेने, सुकुरमावले आये तू दरी रडॉन रडॉन एकुस मगना करतें “नाका भाऑ माला. “नाका भाऑ माला” इस एक गराना मा आईक आन या नव्या दुनियेत हवा पानी खावॉन जकल्या लोकाई शेवा करॅदो जाग्योर सुखी ठव.

■ पिटर थॉमस दोडती, दोडतीआळी

## खोफराडी – एक जुनी आठवन.

साधारन १९७२श्या आसपास आपल्या अडे “खोफराडी” पद्धत होती.
एखाद्या घारा मरान जाला गा गावाशे तरून नीर-निराळ्या गावात जाऑन मरनाई बातमी द्याशे. हारोडी, मामारा, मावशी घारा ताबोडतोब कळव्याशे. इतर नातेवाईकांना पन यंताराई वेळ कळविली जाशी. मंग हारोडी हाळॉ किंवा कून बोठो हायदें तें तॉ शार माहने घॅऑन देवळा जासॉ. देवळात पैशें भरॅसॉ. मंग मेर्नि त्यांना एक खुरूस, एक सांदीऑ मुलामॉ दीलॅलॉ दांड (पोकळ जहॉ बिशपशा हाथात अहते तहॉ) आन मेणबत्तीशे दोन स्टॅंड द्यासॉ. हारोडीशे शार माहने पांडरॉ ओप घालॅशे आन फादर याशा आदि मयता ठिकाणी याशे. याला बॉलात्यात “खोफराडी”. खोफराडी मयता समोर पोसली गा कून तरी उठयासॉ आन जोरात रडॅसॉ.... “बाबो, मामरशी खोफराडी आली रे”. मंग थोडो वेळ जाम रडा रड सल्याशी. मंग एका मागोमाग मावशी घरशी, कुण्यातशी,

गावकऱ्याई, खुपशा नात्यामिननें खोफराडी याशी. कुना दरनें खोफराडी आली ती हाथात खुरूस धरलेले त्या वरनें ओळखिली जाशी. आन मंग बोंब याशी “अंद्रया बाबो, तुला अमुक गावशा बेनीने खोफराडी धाडली रे... आतें तिला तू कतें भॅटॅदा.” गा जकला वातावरण रडका हॉयेसा. त्या वेळी प्रत्येक घरोघरी सफेद कापड्या हिवलेला “ओप” अहेसा. “बाबो, गावशी खोफराडी आली रे...” त्यानंतर देवळातसा सामान यासा. साहजिकूस शिरमंता मरनाला जाम खोफराडी अहयाशो. गरिबा मयताला २/३ अहयाशो. देवळा जाताना जकल्यात पुडे देवळातसा सामान मांगे खोफराड्यो आन नंतर लोक...

---एलायस अँथोनी तुस्कानो, घोटकाल

## सायकल

निवेदक : जकल्या गावकरी लॉकांनो. आज आपल्या आळीमिनें मातृ-पितृ दिन आपुन साजरों करत्याव, त्या निमित्तान मॅं आपल्या यॅका पोराला अडे बोलविलें... त्यामिननें माला एक नवाल दिखला आन या पोराला जर आपुन साथ दिली तें ऑस पॉर उद्या भॉंठो जाल्योर आपल्या गावा नाव काडदें आहा माला वाटला. तॉ पॉर दाव्विऑ विद्यार्थी हाय, त्या नाव जयेश. मॅं तॅला त्या दिहा एकदम नवी सायकल सालविताना बगीला. मॅं त्याला बोयलॉं, “जयेश, सायकल एकदम नवी दिखातें? कॉड्याला हाडली?

तॉं बोयलॉं – काका सायकल नवीस हाय पण विकत नाय हाडली. फुकाट मिळाली.

माला नवाल वाटला. तीन हजार रुपाशी सायकल याला फुकाट कही मिळाली?

तॅनें जा माला हांगीला ताहाशें ताहा आतें तुमाला तॉं हांगॅदें. “सायकल फुकाट कही मिळाली?”

जयेश – मा मायबापानो आन बाहाबेनींनो, माला ई सायकल कही मिळाली ता मॅं तुमाला हांगातें....

आमशा शाळीत वकृत्व स्पर्धा होती. विषय हॉतॉं, “ पर्यावरण”. मॅं त्यात भाग घॅटलॉतॉं. मास्तर लोकाई माला बॉल्या हांगीला. (नंतर जयेश पडद्या मांगें जातें, एक नवी कोरी सायकल घॅऑन येतें, सायकल बाजूला ऊबी करतें त्यास वेळी त्याला जोरात खॉकलॉं येतें. तरीपण तॉं बोल्या सुरवात करतें.)

जयेश – मा गावकरी लोकांनो, तर मॅं तुमाला हांगील्या परमानें माला तडे “पर्यावरण” या विशयोरती बोल्या हांगिलता. (ऑड्यात त्याला परत एकदा खॉकलॉं येतें, ऑड्या जॉरात येतें की थांबता थांबॅना. मिनिट दोन मिनिट तॉं खॉकतॉस रॅतें. ऑड्यात गावशे जकले आयोजक त्याला स्टेजवरनें बाजूला न्यादो येत्यात. जयेश त्यांना थांबवितें आन परत सालू करतें.) “ का जाला माइति हाय गा ? मॅं माइ सायकल घॅऑन अडेस येतॉतॉं, पन ऑ....... रसतॉं जाल्यापासून वाने ओडे वाडल्यात की बॉलता सोय नाय. मांगनें, पूडनें फटफटयो, ट्याक्षो, लॉरयो नुसती लाइन लाग्लोती. त्या गाड्या पायान माइ पार वाट लाऑन टाकीली. पर्यावरण आख्खा खलास करॉन टाकीलें. त्या पायान माला ऑ खॉकलॉं लागलॉं. आतें मॅं बरॉं हाय. रॉ माइ कय काळजी करॉ नाका. मॅं नुसतॉं नाटक कॅलतॉं. तें का जाला, पर्यावरणामुळे माह्नाई कही हानी हॉतें तास मॅं आतें तुमाला हांगातें. खॉ...खॉ...खॉ... का करॅसा ? प्रदूषण जाम वाडलें. जडे तडे जाम प्रदूषण जालें. या धोरा पायान माह्ना जीवाला दॉखॉं कॉडॉं वाडलें आहा बॉलॉन भागॅदें गा? कय फरक पडदें गा. प्रदूषण एक जकल्या डॉखॅला ताप जालें, आहा नुस्ता बॉलॉन भागॅसा नाय. आपुन सगळ्याईस विसार करॉन, कय डॉखा सालवॉन उपाय काड्या पाय आन त्या परमानें कऱ्या-वाग्या पन पाय.

याला कारण बिया कय नाय ना जकल्यांना मान मिळव्याशी चटक लागले ना? आन पैशाव माज पन आलें... हाथापायानें सायकल सालव्याशी हॉडॉन फर्र फर्र करीत धोर ओकीत जात्यात त्योस गाडयो, मोटर सायकली, फोरविलर. त्या परसातें पेट्रोल डिजेल शें भाव पन भरमसाठ वाड्या लागल्यात. त्यापेक्षा कडे मॅरें दारें जासा अह्ला तें पायी जादो का हॉतें? दोन पावले सल्यादो आपलें पाय कय मॉडात्यात गा? पन नाय ना. निदान देवळा जाताना तरी पायी जादो का हॉतें? कळातें पन वळें नाय ना....

तुमे ते बगीत्यास या गाड्यापायान कोडें ॲक्षिडण हॉत्यात. त्यापेक्षा गाडयो जरा कमी वापरॉन आपला पुडसा आयुष्य बरा ठॉया करता सायकली वापरल्यो तें कॉडॉं फायदॉ हॉयॅदें? पेट्रोल वाशॅदें, खर्स कमी हॉयॅदें आन प्रदूषण पन हॉयॅसा नाय. कमी प्रदूषणापायान आपल्याला डॉक्टरशी पारी पन सडें लागॅशी नाय. तब्यात पन एकदम ठणठणीत रॅदें.

तहास बियो गोशटी जहयो पाण्या इंजाण, जनरेटर याव खूप वापर हॉतें, त्या पायान दिहाण दी प्रदूषण वाडात सालला. लोकसंख्या पन खुब वाडले.

तुमाला सायकलशी कानी हांगातें, “जिगाळा सायकल सॉ शोद लागलॉं तिगाळा बॉठ्ठा नवाल वाटला. लॉकाव जाम वेळ वाश्या लागलॉं. सलात सलात जाण्यापेक्षा लवकर जाता या लागला. पन यो गाडयो आल्योस गा, आन सगळा पॅंडका भिजात पडला.

पेट्रोल डिजेलसों खर्च वाडलों, धोर आला, ऑक्षिडणशी भीती पन वाडली. आंगाव व्यायाम कमी जालों. आजारपण वाडला. का हाय माईती हाय गा? माह्नू हिकलों, सुधारलों आन तॅला वेळ पूरॅसों रॅलों. भगून माह्नाई डॉखा सालवॉन मोटरसायकलीयो शोद लावीलों. पन यास मोटरसायकलीनॅं कॉड्या लॉकाव जीव घॅटलों? भगून विसार करा आनी मॅरॅं दॅरशा गावात जासा हायदॅं तॅं सायकल वापरा. सायकलशॅं खुब फायदॅं हात. पेट्रोल लागॅं नाय, रीपेरिंगसॉं खर्स कमी येतॅं. वाटेत कडे बिगडली तॅं हातात धरॉन नेता येतॅं. जीवाऑं घात हॉयॅं नाय. आंगाव व्यायाम पन हॉतॅं. उशी वाडातॅं. या जकल्या फायद्यामुळॅं आजकाल पैशॅवालॅं लोक पन सायकल वापऱ्या लागल्यात.
मॅं गॅल्या मयन्यात एका पॅपरात वाशिला चीन मीनसॉं एका बॉठ्ठ्या कॉलेजसॉं कुलगुरू आख्खा आयुष्य भरात आला तरी सायकल वापरतॉतॉं. बोठ्ठे बोठ्ठे माह्ने जर सायकल वापरत्यात, तॅं आपल्याला लाज कय वाटातॅं? माकून एकदा विसार करा आन आपली सुक सुधारा.

सालवा रॅं सालवा सायकल सालवा
सायकल सालवॉन आजार पळवा
सायकल सालवॉन इंधन वासवा
बॉठ्ठा संकट प्रदूषणाला आला घाला
सायकल हाय क्रांति इ वाट
सायकल हाय प्रदूषनोर मात
इंधना वापराला दिली थाप
(जयेशसा भाषण खपातॅं...)

मनुनुस सायकल हाय निशाप
मनुष्य बळोर सलणारी
माह्नाकरता सलणारी
आरोग्य वाढविणारी
परतपेढी अपेक्षा न बाळगणारी
बहुजन हिताई जवळशा प्रवासाकरता सुखाई

जयेश – मा गावकऱ्यानो इ जी माई नवी सायकल हाय ना ती माला यास भाषणा करता वक्तृत्व स्पर्धेमीनॅं बक्षीस मिळाली.

--- फिलिप अल्फान्सो, गास.

# दाव्वी, बारावी, सीईटी

दाव्वीआ रिजल्ट लागला, आपल्या एरियामिनॅं ९०%शा वर मार्क मिळालेल्यायी संख्या शंभरश्या वर हायदॅं.. कून या शाळीतनॅं पयलॉं, तॅं कून त्या शाळीतनॅं दुहरॉं... पालक जाम खुश झालॅं.. अभिमान वाटन्याहारकॅं मार्क आपल्या पॉराला/पोरीला मिळालॅं.. सगळ्यात पयली पार्टी जाली..पावनॅं बोलविले, मित्र बोलविलॅं, शारदी घरशॅं सगळे नुसतॅं हवॅंत तरांगातॉतॅं, मग ॲडमिशनश्या मागॅं लागलॅं.. सायन्सलास घ्यासा .. इंजिनियरिंगला धाडयासा हाय.. मा पॉराला तॅं ९५% मिळाल्यात, त्याला आयआयटीमिनॅं धाडयासा, मग बेस्ट क्लासेस कुह्नॅं? जोडी फी जास्ती तॉडॉं भारी क्लास, २ वहराकरतान २ लाख-३ लाख रुपय फी, पैशे कडशॅं हाड्याशॅं?, पीएफ मिनशॅं काडॉं.. पन मा पॉर इंजिनियर झालॉं पाय..

१२वी रिजल्ट लागला, ९०/९५ टक्केवाळॅं धाडकन ६० टक्क्याश्या लेवलला आले?. कय नाय १२वी ओ अभ्यास त्यानॅं केलॉ नॉतॉं.. सीईटी वर त्या लक्ष हॉता... सीईटी सा रिजल्ट लागला.. स्कोअर कॉडॉं.. ८०/९०/१००/११०...आतॅं का?.. आपलॅं कॅथॉलिक इंजिनियरिंगशॅं कॉलेजेस हात तडॅं मिळदॅं.. मॅनेजमेंट कोटामिने मिळदॅं.. डोनेशन-१.५/२/३ लाख... हाड्याशॅं कडशॅं?, कंपनी कर्ज देतॅं.. नातॅं आपली कॅथॉलिक बँक हायीस..पन त्याला इंजिनियरिंग झेपॅदॅं गा? ओडो खर्च करॉन त्याकरता ॲडमिशन घॅतला पन पुढॅं त्या बळॅं नाय झाला तॅं?.. आन इंजिनियरिंगशी ४ वहराइ फी, खर्च, क्लासेसशी फीज माला झेपॅदॅं गा?..

आपल्या अडश्या गावा-गावामिनॅं अही परिस्थिती हाय. आतॅं सीईटी खपला.. फक्त एकुस नॅशनल लेवलशी एन्ट्रन्स एक्झॅम.. ५०% १२वी शॅं धरणार.. सीईटी पेक्षा ती एक्झॅम जामूस टफ..एसएससीला ३०% मार्क्स शाळीतनॅंस देत्यात... आन बेस्ट ऑफ फाईवने मग ९०/९५% मार्क्स.. मार्क्स नाय ना नुसतॅं शिसारॅं वाटीत्यात.. पोरा बय-बापायी अपेक्षा वाढातॅं.. आन या ९०/९५% मिळवणाऱ्या मिनशे ८०% पोरे बारावीला एकदम खाला यॅत्यात.. उलट दाहावीला ८०/८५% मिळवणारे पोरे बारावीला आन सीईटीला चांगलो स्कोअर करत्यात.

या मांगशे कारनॅं का अहु शकात्यात?

शाली जीवनातनें एकदम मॉकळ्या अह्या कॉलेजश्या जीवनात प्रवेश हॉतें.. पोरे एकदम भुरकात्यात, मोबाइल, इंटरनेट, फेसबूक, व्हॉट्स अप, बाइक या सगळ्या गराड्यात अड्कात्यात, प्रेमात पडना/व्यसन लागना.. यी या वयातुस हॉतें..मग अभ्यासाओरती दुर्लक्ष हॉतें. कदाचित आपल्या पॉरा/पोरीओ कल कडे हाय, नक्की पुढश्या आयुष्यात का कऱ्यासा हाय यी आपल्या पॉरांनापन कळेस नाय. आन ९०/९५% मिळालें मनून आपुन त्यांना सायन्सला ॲडमिशन देत्याव. पॉरांना नववी-दाहावीत असताना का दडपन दिला जातें? सरकारशें शैक्षणिक धोरनें दर वहारा बदलात्यात. आपलें पॉरे राटाला झुपिलेल्या बैलाहारकें झाल्यात, कुण पन येतें, परानी मारॉन हाखलीत रॅतें. आन आपुन पन त्यात सामील हात. या विशयोर सीरियस चर्चा होन्यायी गरज हाय.

सायमन रॉड्रिग्ज, आगाशी, क्रॉस नाका

---

## दुमा सा दुमिला प्रेम पत्र

दुमे
तुला वेळ मिळालॉ तें आपून दोगाइ प्रेम कऱ्यासा
तुला वेळ मिळालॉ तें आपून दोगाइ प्रेम कऱ्यासा
में दारपूडनें जाताना तू आंगळ्यात उभी रयाशी
बयला सवशय नाका मनून तू आंगळ्यातशा झाडाला पानी घाल्याशी
आंगळ्यातशा फुलाला फुलव्याशी आन बयला भूलव्याशी
तुला वेळ मिळालॉ तें आपून दोगाइ प्रेम कऱ्यासा
तुला वेळ मिळालॉ तें आपून दोगाइ प्रेम कऱ्यासा

दिल दिवाना, हमे तुमशे प्यार कितना, तेरे बिना मुजे नही जीना
अहें शेर शायरो आपून पत्रात लीव्याशें
कतें देवळ्यात भेटयासॉ योग आलॉ गा तू हळूस बय हरी पळ्याशी
तुला वेळ मिळालॉ तें आपून दोगाइ प्रेम कऱ्यासा

आहां करता करता कळला तुआ घारा आन कळविला मा घारा
मंग सालू जाली तुआ लग्नाई तयारी
मंग तुला आलें फुलवाल्याय आन शालीश्या मास्तरशें ओबडें निरोप
आन तू त्या सगळ्या निरोपाला मिन्गारश्या सुलीत दिला टाकॉन
आन केला प्रेम मावरूस
आणि मंग का आतें आला आपल्या परीक्षेओ वखत
आपल्या प्रेमाई परीक्षा
आपल्या दॉगा मीनें एक भेटल्या विषयी
तू पयली गा में पयलॉ आहां करॉन नाय कऱ्यासॉ मारॉ
दॉगानें हातात हात घाल्यासॉ आन ......
पान डॉक्यात ठोव्यासा
त्यातनें पन जर वासलें तर आपून दोगाइ प्रेम कऱ्यासा....
तुओ आन फक्त तुओस दुमा

मिल्टन रिबेलो, नानभाट

---

## हिरान-लाल लुगडा

गळ्यात हिरान, लाल लुगडा नॅहॉन मिरवातें बग भोटी बय
साजशृंगार यो कॉडॉ मस्त, बॉल्याशी नाय कय सोय

कॉहाळा डोख्योरनें घॅवॉन ती देवळा गेली
पदर खोशिलॉ आन भाटात गेली
खांद्योर रुमाल टाकिलॉ पावण्या घरा गेली
माथ्योर शंभरायी पाटी घॅवॉन बाजारा गेली

उटीमीने नातवादो खाण्यायी पुडी निकविली
पण ती द्याशी वेळ दुहृऱ्या दी आली
कमऱ्याला सशी कायमशी टांगलेली
कतें त्यात दिडकी नातें नुस्तीस खाली अहलेली

वाडवाला ता हिरान आतें, पोवळें आन भिनू झालें मोकळें
शार बाहा, दोन बेन्यो त्या करता किती तरी दी भांडलें
एकमेका ताँडोर ताँड द्याशे रेलें
इस गा ती किमत त्या मा बयशी रेलें

लाल लुगड्याशें पन पायपुहने झाल्यात
मिन्गारश्या दारात त्याये फडके पायाखाला पडल्यात
हनावाराला आन लग्नाला आतें भराते कपड्याव बाजार
नवीन फॅशन सॉ आतें झालें आमाला आजार.

-- ख्रिस्तोफर रिबेलो, सोकाळा

# कौतुक



**कु. निकीता विन्सेंट आल्मेडा, हिडी-नानभाट**
**होली क्रॉस कॉन्वेंट स्कूल, नानभाट**

देवाश्या कुरपॅन अन खुब मेहनत करॉन यंदाश्या एसएससी (मार्च २०१३) परीक्षेमिन्ये तू ९४.७३% मार्क मिळवॉन, हिडीश्या आल्मेडा कुटुंबाआ आन मामरश्या मिनेज घराण्या नाव उज्वल कॅला. आमा जकल्याना तूआ खुब खुब कौतुक वाटात्ये. तूआ यशाबद्दल देवाशे आभार आन पुडश्या शैक्षणिक जीवनात तुई अहीस प्रगती हॉत रॅओ, अहयो लाखमोलायो शुभेच्छा!

**मम्मी-पप्पा – फुलान आन विन्सेंट**
**मामा – जॉन मिनेज, मदरीन – सुरेखा रिचर्ड मचाडो**

---

## अंकाकरता देणगी

अर्नेस्ट सिरील मिनेझीस, आगाशी – १११**१ ₹**

अंद्रूसर – १०० ₹

विन्सेंट आल्मेडा, हिडी-नानभाट - १०० ₹

बेनेट फर्नांडिस, फर्नात आळी - १०० ₹

विल्सन रिबेलो - सोकाळा – १०० ₹

स्नेहल सॅमुएल आल्मेडा, हिडी-नानभाट - १०० ₹

अनामिक, वटार-बारोडी - १०० ₹

फेलिक्स आल्मेडा, अक्करवाडी-आनंदवन – १०० ₹

## स्वेच्छा मूल्याद्वारे जमा झालेले पैशे

घोसाळी - १०८७ ₹

दोनतलाव – ७०० ₹

वटार-बारोडी - १७० ₹

सोज आळी – ३५० ₹

पोंडा – २२० ₹

भागाळी – १४० ₹

फर्नात आळी & राजणी आळी – ६५० ₹

पवित्र त्रैक्य, गोम्स आळी परिसर – ३०५ ₹

---

<u>संपर्क / अभिप्राय</u> :- आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान किंवा आपला या अंकाविषयी मत, तुमाला का आवडला, का नाय ता आमाला जरूर कळवा. आमश्या ई-मेल आयडी वर ई-मेल करा नाय ते फोन करा

<u>सूचना</u>:- कादोडी अंकाव यापुढसॉ अंक मावली हनावेळेला, ०८ सप्टेंबरला प्रकाशित होणार. या अंकात तुम्हाला लेख कविता आहा कय साहित्य द्यासा हायदॅं तॅं ०१ ऑगस्टपर्यन्त **kadodivasai@gmail.com** मेल करा किंवा संपादक मंडळाला संपर्क करा.

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदॅस आहा नाय.**